
कॉमिक

ओरिजित सेन आणि समर्थ

# 20ची टोळी



**सेंटर फॉर फायनान्शियल अकाऊंटॅबिलिटी (सीएफए)**
वित्तीय संस्थांमध्ये पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन आणि पाठिंबा देते. आम्ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांच्या गुंतवणुकीवर लक्ष ठेवतो, बँकिंग क्षेत्रावर आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या धोरणांवर काम करतो. चळवळी, संघटना, कार्यकर्ते, विद्यार्थी आणि तरुणांना कॅम्पेनमध्ये सहभागी होण्यासाठी आणि उद्युक्त करण्यासाठी आम्ही संशोधन, मोहिमा आणि प्रशिक्षणांद्वारे हे करतो ज्यामुळे बँकिंग आणि अर्थव्यवस्थेवरील धोरणे तसेच सार्वजनिक चर्चा बदलू शकतात आणि नागरिकांना बँक व सरकार अधिक पारदर्शक आणि उत्तरदायी बनविण्यात मदत करण्यासाठी वित्त जगाचे रहस्य उलगडू शकतात.अधिक माहिती खालील साईटवर मिळू शकते. www.cenfa.org

CFA
Centre for Financial Accountability

**ओरिजित सेन :** हे एक ग्राफिक कलाकार असून म्युरॅलिस्ट, व्यंगचित्रकार आणि भारतात, गोवा येथे स्थित डिझायनर आहेत. ते 'पीपल ट्री'चे सह-संस्थापक आहेत, जो कलाकार, डिझाइनर आणि कारागीर यांच्यासाठी एक सहयोगी स्टुडिओ आहे. ओरिजित हे रिव्हर ऑफ स्टोरीजचे (1994) लेखक आहेत, जी भारतातील पहिली ग्राफिक कादंबरी मानली जाते. 2021 मध्ये, ओरिजित यांनी एकतारा ट्रस्टच्या सहकार्याने 'कॉमिक्सेन्स' लाँच केले – जे तरुण वाचकांसाठी असणारे एक कॉमिक्सचे त्रैमासिक आहे आणि ओरिजित त्याचे मुख्य संपादक आहेत. ते कॉमिक्स आणि ग्राफिक आर्टसदेखील शिकवतात आणि गोवा विद्यापीठात 'मारियो मिरांडा चेअर व्हिजिटिंग प्रोफेसर' आहेत त्याचबरोबर अशोक विद्यापीठाच्या व्हिज्युअल आर्ट्सच विभागाचे व्हिजिटिंग प्रोफेसर आहेत.

**समर्थ :** समर्थ हे ग्राफीक कादंबरीकार आणि संशोधक आहेत. त्याची पहिली ग्राफिक कादंबरी 'सूट' ही योडा प्रेसने जानेवारी 2022 मध्ये प्रकाशित केली. सामाजिक-राजकीय संबंधांचा अभ्यास आणि विवेचन करण्यासाठी त्यांचे कार्य हेच त्यांच्यासाठी एक साधन बनले आहे. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी अध्ययन अनुभव तयार करण्यासाठी गेल्या 2 वर्षांपासून ते सामाजिक आणि विकास क्षेत्रात काम करत आहेत. त्यांचे बहुतेक स्वतंत्र काम कामाच्या तासांच्या वेळेपूर्वी आणि नंतर घडते. इन्स्टाग्रामवर त्यांचे 'रोकिन' या नावाने हँडल आहे, तिथे तुम्ही त्यांचे कार्य पाहू शकता.

**सोनल रघुवंशी:** सोनल रघुवंशी या पुस्तकाच्या संपादक आणि समन्वयक आहेत. त्या राजकीय अर्थव्यवस्थेच्या अभ्यासक आहेत आणि सध्या सेंटर फॉर फायनान्शिअल अकाऊंटॅबिलिटीशी संबंधित आहेत. त्यांचे संशोधन विकासात अर्थव्यवस्थेच्या असणाऱ्या भूमिकेकडे (विशेषत: आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांशी संलग्न) आणि विकसनशील अर्थव्यवस्थेमधील स्थूल आर्थिक धोरण याकडे लक्ष ठेवते याशिवाय त्या अर्थशास्त्र या विषयामध्ये गांभीर्याने काम करतात. त्या एका शैक्षणिक जर्नलच्या सहसंपादकदेखील आहेत आणि विविध पुरोगामी विद्यार्थी गट आणि चळवळी यांच्या एक आयोजकही आहेत.


**मुद्रक :** जेरी प्रिंटर्स
**अनुवाद :** अनिल आठलेकर
**प्रकाशक:** सेंटर फॉर फायनान्शिअल अकाऊंटॅबिलिटी आर21, साऊथ एक्स्टेंशन भाग 2. नवी दिल्ली 110049, भारत
www.cenfa.org
email: info@cenfa.org

प्रस्तुत कॉमिक पुस्तक ही एक काल्पनिक कलाकृती असून जिवंत किंवा मृत वास्तविक व्यक्तींशी किंवा वास्तविक घटनेशी कोणतेही साम्य आढळल्यास निव्वळ योगायोग समजावा. हे पुस्तक नियमित स्वरूपांच्या पलीकडे असणाऱ्या आणि प्रथमदर्शनी जटिल वाटणाऱ्या राजकीय अर्थव्यवस्थेचे प्रश्न सुलभ पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करते. हे पुस्तक हेन्रिक बॉल स्टीफ्टंग यांच्या पाठिंब्यामुळे प्रकाशित झाले. या पुस्तकात असणारी दृश्ये आणि अभिव्यक्ती प्रस्तुत पुस्तकाचे लेखक आणि भागीदार यांची असून हेन्रिक बॉल स्टीफ्टंग यांचा त्याच्याशी संबंध असेलच असे नाही.

HEINRICH BÖLL STIFTUNG
REGIONAL OFFICE NEW DELHI

CC BY NC ND
This work is licensed under Creative Commons License CC BY-NC-ND
This license allows reusers to copy and distribute the material in any medium or format in unadapted form only, for noncommercial purposes only, and only so long as attribution is given to the creator.

CC BY-NC-ND includes the following elements:
BY – Credit must be given to the creator
NC – Only noncommercial uses of the work are permitted
ND – No derivatives or adaptations of the work are permitted


जी20 जागतिक नेत्यांची वार्षिक शिखर परिषद प्रथमच भारतात होणार आहे. पंतप्रधान आणि त्यांच्या टीमने सोहळ्याच्या आयोजनामध्ये कोणतीही कसर सोडलेली नाही..
सर...


बोल, काय आहे ?
सर, आपण सर्व उपलब्ध वर्कस्टेशन्सवर फायबर ऑप्टिक केबल्स यशस्वीरित्या मार्गस्थ केल्या आहेत. दळणवळणासाठी 300 हून अधिक केबल स्ट्रँडस् बसवण्यात आले आहेत.
छान! हे सर्व जागतिक दर्जाचे असल्याची खात्री करा! त्या कॅनेडियन लोकांनी गेल्या जी20 मध्ये जे काही मांडले त्यापेक्षा किमान एक पाऊल पुढे असावे!
हे ठिकाण प्रसिद्ध चहा-पाणी तलावाच्या काठावर विक्रमी वेळेत वसवले आहे, ज्याचे नाव पंतप्रधानांनी जवळच्या रेल्वे स्टेशनवर चहा विकल्याच्या दिवसांच्या स्मरणार्थ बदलले आहे.
G20 राष्ट्रांचे नेते आत येत असताना, ते जे पाहतात ते पाहून ते प्रभावित होतात.
बापरे! आम्हाला इतक्या भव्यतेची अपेक्षा नव्हती!
कोरियाचे अध्यक्ष
वसुधैव कुटुंबकम्!
खाकरत... काय?


परिसर सुरक्षित करण्यासाठी सुरक्षा दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत.
मागे फिरा, तुम्हाला गेटकडे गर्दी करण्याची परवानगी नाही!
अरे, आम्ही का हटू? आम्ही देशभराचा प्रवास करून इथवर आलो आहोत!
जर कोणाला हटवायचे असेल तर ते परजीवी आहेत ज्यांचे तुम्ही रक्षण करत आहात, त्यांना हटवा!
जी20 मुर्दाबाद !
त्याचवेळी गेटपाशी जनावरांचा मोठा कळप विरोधासाठी जमा झाला आहे.
G20 GO BACK
G | POVERTY PEOPLE
2 | POLLUTION PLANET
O | PARALYSIS PROSPERITY


सर्वात सामर्थ्यवान देशांच्या बैठकीची सुरुवात त्याच क्षमतेच्या भाषणाने सुरू झाली पाहिजे.
माझ्या मित्रांनो, आपण जगातील सर्वात जुनी संस्कृती आहोत! त्यामुळे यावेळी आपणच जी20 चे आयोजन करणे योग्य आहे. भारत हे सर्व देशांसमोर प्रगतीचे ज्वलंत उदाहरण आहे.
“ऐका, ऐका त्याचं! मीपणाचा दर्प नुसता! त्याच्या देशानेसंस्कृती आणि सभ्यता आमच्या लोकांकडून शिकून घेतली आहे.”
अमुक तमुक
sss
अमुक तमु sss
त्याला आता त्याचा फुगा फुगवू द्या. तुम्ही बघाल, नंतर तो फोडणे ही एक मेजवानी असेल.
फ्रान्सचे अध्यक्ष
हाहाहा हाहाहा हाहाहा
चीनचे अध्यक्ष
मला आशा आहे की तुमच्या अणु प्रकल्पांचं काम जोरात सुरू असेल. आम्ही चार नवीन युरेनियम खाणींवर आगाऊ अंदाजाने काम सुरू केले आहे.
आम्ही त्यावर काम करत आहोत. पण तुम्ही बघा, आमचे नागरिक नेहमीच एखाद्या गोष्टीबद्दल आमची ताकद दाखवून देण्याच्या संधीच्या शोधात असतात!
“मला कबूल करावेच लागेल की तुम्ही अशा... अं... अडचणींना सामोरे जाण्याचे व्यवस्थापन करण्यात चांगले वाकबगार आहात!”
“हेहेहे..”
“हो, हो.. आम्ही आशा ‘आवाच कमी करण्याच्या’ तंत्रज्ञानावर उदारपणे खर्च करतो.”


नेते मग त्यांचे सौहार्द आणि सद्भावना प्रस्थापित करण्यासाठी नेहमीचे स्मितहास्य करतात आणि पोझ देतात.
त्याच्यासोबतच्या छायाचित्रात हसण्यासाठी मला आणखी एक पेय आवश्यक आहे.
हेहे, मोर अमेरिका आणि इस्रायलशी मैत्रीपूर्ण होताना दिसत आहे.
हं ! पण तो दुर्बळांच्या मागे खंबीरपणे उभा राहतो.
रशियाचे प्रधानमंत्री
ब्राझिलचे प्रधानमंत्री
CLICK
CLICK
दरम्यान, बाहेरचा जमाव पुढे सरसावलेल्या एका तरुण मुलीभोवती गोळा होतो.
मित्रांनो, मी इथे खूप दूरवरून आले आहे.
आम्ही महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतकरी आहोत आणि आम्ही आमच्या अस्तित्वासाठी लढत आहोत.


हे नेहमीच असे नव्हते.
माझ्या आजोबांच्या काळात जमीनीतून अनेक प्रकारची पिक येत होती. माझ्या कुटुंबाने कठोर परिश्रम केले आणि त्यामुळे आमच्याकडे नेहमी पुरेसे अन्न असायचे.
सरकारी कार्यक्रम सुरू झाल्यानंतर, आमच्यापैकी बरेचजण अधिक नगदी पिके घेण्याकडे वळले कारण आम्हाला वाटले की ते चांगले उत्पन्न देतील.
सुरुवातीला तसे झालेही, परंतु नगदी पिकांनी आम्हाला रोखीवरच अवलंबून रहायला भाग पाडले. बियाण्यांपासून खतांपर्यंत सर्व काही आम्हाला बाजारातून खरेदी करावे लागले.
कालांतराने एकाच पिकाची सतत लागवड केल्यामुळे आणि रसायनांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होऊ लागली.


आमचे उत्पन्न कमी होत असतानाही, आम्ही जगण्यासाठी म्हणून अधिक कर्जे घेण्यास सुरुवात केल्याने आमचा अधोगतीकडे प्रवास सुरू झाला.
अनेकांना कर्जाची परतफेड करता आली नाही. काहींनी आपल्या जमिनी विकल्या आणि नोकरीच्या शोधात स्थलांतर केले.
आमच्यापैकी काही जे मागे राहिले ते कर्जाच्या ओझ्याखाली दबले गेले. अनेकांना स्वत:चा जीव गमवावा लागला.
या वर्षी, किंमती इतक्या कमी झाल्या आहेत की - नफा तर विसरा - आम्ही आमचे वार्षिक कर्जसुद्धा परत करू शकणार नाही
आणि जर आम्हा अल्पभूधारक शेतकऱ्यांची ही स्थिती असेल, तर भूमिहीन शेतकऱ्यांची आणि खंड देणाऱ्या शेतकऱ्यांची काय अवस्था होईल याची तुम्ही कल्पनाच करू शकता!


आम्हाला आमची पारंपारिक शेती कौशल्ये आणि पद्धती सुधारण्याची आणि स्वतंत्र आणि स्वावलंबी शेतकरी बनण्याची संधी हवी आहे.
पण त्याऐवजी सरकार काय करते? ते नवीन शेतीविषयक कायदे आणण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे आम्हाला मोठ्या कंपन्यांचे आजीवन गुलाम बनवले जाईल.
आज मला माझा आवाज आतल्या लोकांना ऐकवायचा आहे – ते लोक, जे ही धोरणे ठरवतात. मी आज येथे आले आहे कारण माझ्या कुटुंबाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे.


भूक
तुमच्यापैकी किती जणांना खरी भूक माहीत आहे आणि ती लोकांशी कशी निगडीत आहे?
याउलट, आत मात्र दावे खूप वेगळे केले जात आहेत.
आपली धोरणे जगातील कोट्यवधी उपासमारी होत असणाऱ्या लोकांच्या अन्नसुरक्षेबाबत मानवी आणि तत्त्वनिष्ठ स्थितीवर आधारित असणे आवश्यक आहे.
ऐका, ऐका
ऐका, ऐका
अमेरिकेचे अध्यक्ष
पण ...
स्थिर बाजारपेठेशिवाय हे कसे साध्य करायचे? आपल्याकडे आत्मविश्वासपूर्ण अर्थव्यवस्था असेल तरच अन्न उत्पादन वाढेल.
केवळ आपल्या बाजारपेठेतील आघाडीच्या खाजगी कंपन्याच अन्न सुरक्षेचा पाया रचू शकतात!
माफ करा, सर...



उदरनिर्वाहासाठी शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची या नफाखोर कंपन्यांकडून पिळवणूक होणार आहे.
होय! शेतकरी उपाशी असताना आपण स्वावलंबी कसे होणार?
अन्न सुरक्षा हे सरकारचे कर्तव्य नाही का?
केनियाचे
कृषी सचिव
सरकारचे कर्तव्य म्हणता तुम्ही हे? तुम्ही तुमच्या सुरक्षिततावादी विचारसरणीने तुमच्या लोकांना या खेदजनक स्थितीत आणले आहे!
जागे व्हा आणि डोळे उघडा मॅडम! बाजार आणि त्याची स्वयं-नियमन यंत्रणा सर्व गोष्टींची काळजी घेऊ शकतात!
सर्व गोष्टींची !
हाहाहाहा
SPLASH
SPONSORED BY MEGACORP®
तुम्ही जे म्हणत आहात ते संयुक्त राष्ट्रांनी मान्य केलेल्या शेतकऱ्यांच्या हक्कांबद्दलच्या आंतरराष्ट्रीय कराराच्या विरोधात आहे..


यूकेचे
प्रधानमंत्री
हाहाहाहा
संयुक्त राष्ट्र? मंत्री महोदय, आजूबाजूला पहा. आपणच संयुक्त राष्ट्र आहोत!
बलाढ्य देश फसवणुकीचे खेळ खेळत असताना, बाहेर उलगडणाऱ्या कथा नवीन वास्तव समोर आणतात.
आपण स्वयंपाकघराची व्यवस्था केली पाहिजे. मुले उपाशी आहेत.
SAVE CLIMATE
REFUGEES


माझ्या बंधू आणि भगिनींनो, मी जे सांगतो त्यावर तुमचा विश्वास बसणार नाही, पण आम्ही ते आमच्या डोळ्यांनी पाहिले.
SAVE CLIMATE REFUGEES
इतकी वर्षे आमची आईसारखी काळजी घेणारा, आमचा समुद्र अस्वस्थ आहे.
आम्ही मच्छीमार आहोत, आम्ही आमच्या कुटुंबाचे पोट भरण्यासाठी तिच्यावर अवलंबून आहोत. आम्हाला या अस्वस्थतेची कुणकुण अगोदरच लागायला हवी होती.
गेल्या काही वर्षात ती आपल्या घरापर्यंत ये-जा करत होती, पण या वर्षी तिने ती पूर्ण गिळूनच टाकली.
आमच्या गावात आता ढिगाऱ्याशिवाय काहीही उरले नाही आणि आम्हाला जायला कोठे जागाही शिल्लक नाही.


येथील ही बांधकामे बेकायदेशीर आहेत. त्यांना नष्ट करा! बाहेर निघा! तुम्ही इथे एकत्र येऊ शकत नाही!
आमच्या मुलांना उज्ज्वल भविष्याचा अधिकार नाही का?
आम्हाला आमच्या राष्ट्राच्या नेत्यांकडे भीक मागावी लागेल का?
आमच्या वाट्याला आलेल्या दुर्दैवासाठी आम्हीच जबाबदार आहोत का?
CRASH
DHUD
DHUD
एकीकडे संपूर्ण गावे बुडत असताना, सर्वात बलाढ्य राष्ट्रांच्या नेत्यांचा बुडण्याबद्दलचा स्वतःचा वेगळा भ्रम आहे.


आणि आता हिरव्यागार भविष्यासाठी सर्वांचं अभिनंदन!
आम्ही, महान राष्ट्रांच्या नेत्यांनी, हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी मोठी पावले उचलली आहेत. मी तुमच्यापैकी प्रत्येकाच्या प्रयत्नांना सलाम करतो!
ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री
तरीही, आपण स्वतःला आठवण करून देऊया की लढाई जिंकणे अजून फार दूर आहे...
तेल, कोळसा आणि वायूवर जगाचे असणारे अखंड अवलंबित्व लक्षात घेता, आपण ते चमत्कार वगैरे करून त्याचा वापर पूर्णपणे थांबवू शकत नाही.
मग आता पुढे मार्ग काय आहे?
याचे उत्तर 'लहान पण निर्धारीत पावले उचलणे' हे आहे.
उदाहरणार्थ, माझ्या मंत्रिमंडळाने नुकतीच मंजूर केलेली 'अल्कोहोलवरील अवलंबित्व पुर्णपणे कमी करण्याची योजना' पहा.


आम्ही उद्योगप्रमुखांना आश्वासन दिले आहे की या योजनेमुळे त्यांच्या मद्यपान कार्यक्रमांवर अल्प किंवा मध्यम कालावधीत परिणाम होणार नाही. आम्हाला आता त्यांचा पूर्ण पाठिंबा आहे!
आपण एका रात्रीत अल्कोहोलविरहित पेयांचे आकर्षण वाढवू शकत नाही, शकतो का? आपली दीर्घकालीन उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अल्प कालावधीसाठी बिअरच्या वापरामध्ये अतिरिक्त गुंतवणूक करावी लागेल.
उदाहरणार्थ, माझे मंत्रिमंडळ - ज्याचे सरासरी वय 73 आहे - ते 100 वर्षांचे होईपर्यंत नेहमीप्रमाणे मद्यपान करत राहतील.
ते नंतर पुढील 10 वर्षांमध्ये धोरणात्मकपणे मद्यपान कमी करण्यास सुरवात करतील, जोपर्यंत ते निव्वळ-शून्य अल्कोहोल वापरापर्यंत पोहोचत नाहीत.
मद्यपान करणे थांबवण्याची शेवटची तारीख 2060 पर्यंत असू शकते.
तसे असल्यास, आमच्यासाठी आणखी 20 वर्षे धरा ! आम्ही अजूनही... विकसनशील राष्ट्र आहोत, म्हणजे बघा!
वा ! किती दूरदर्शी कार्यक्रम आहे मंत्री महोदय!
भविष्यासाठी, बंधू आणि भगिनींनो !


सर !!
Bzzz
Bzzz
Bzzz
Bzz
निषेध? निर्वासित? हा फुटीरतावाद्यांचा डाव असावा!
सर, आंदोलक हवामान संकटावर त्वरित कारवाई करण्याची मागणी करत आहेत. त्यांनी उपोषणही सुरू केले आहे.
ह्म्म्म, सर्वत्र आंतरराष्ट्रीय मीडिया त्यांच्याभोवती रेंगाळत आहे आणि आम्ही या क्षेत्रातील नेटवर्क कनेक्टिव्हिटीदेखील बंद करू शकत नाही.
परिस्थिती खूपच तणावपूर्ण आहे सर. एनएसएने पूर्ण प्रमाणात कारवाईसाठी मंजुरीची विनंती केली आहे!
मला काहीतरी विचार करू दे...


इस्रायलचे
प्रधानमंत्री
PAT
PAT
त्यांना आंदोलनकर्त्या नेत्यांना ओळखून यूएपीएअंतर्गत अटक करण्यास सांगा. बाकी मी सांभाळेन. आपल्याकडे समर्थन आहे.
हिंसाचारात गुंतलेले लोक त्यांच्या कपड्यांवरून ओळखले जाऊ शकतात.
गेटच्या पलीकडे, कळप पुढे होऊ घातलेल्या दीर्घ लढाईसाठी तयार होऊन उभा आहे.


AISE DASTOOR KO,
MAIN NAHI MANTA!
सहेंगे!
देशभरातील सर्व वर्गातील मंडळी जसे की विद्यार्थी, शिक्षक, शेतकरी, कामगार... आंदोलनात सहभागी होतात.
जी20 मुडदाबाद
जी20 मुडदाबाद
UNITE! against IMPERIALISM
WE SHALL FIGHT! WE SHALL
अत्याचार
सहेंगे!
G20 Go Back
आजची लढाई ही आपल्यापैकी काही लोकांची लढाई नाही, तर आपल्या सर्वांसाठीची लढाई आहे!
आमच्या लोकशाही संस्थांना बेड्या ठोकल्या गेल्या आहेत, त्यांचे नियंत्रण असलेल्या लाचार माध्यमांनी आमचे आवाज बंद केले आहेत!!
जर आपण सर्व समान रीतीने त्रस्त आहोत तर आपण समानपणे लढले पाहिजे. आपण सर्वजण जे G20 राष्ट्रांच्या धोरणांखाली, त्यांच्या पोलीस राज्यांत आणि लष्करी अजेंड्यांच्या अंतर्गत संघर्ष करत आहोत...
लोकशक्ती झिंदाबाद!


...आम्ही या भूमीवरील सर्व उपेक्षित आणि शोषित प्राण्यांच्या ऐतिहासिक संघर्षांसाठी उभे आहोत!
ते आम्हाला देशद्रोही ठरवतात, पण प्रथम त्यांना तरी देशभक्ती कळते का?
आपण विद्यार्थी, निर्वासित, कामगार, शेतकरी...सर्वांनी आपला संघर्ष संयुक्तपणे केला पाहिजे.
इन्कलाब झिंदाबाद!


मित्रांनो, जगात शाश्वत शांतता, स्थिरता आणि शाश्वतता आणण्यासाठी आपण आपल्या स्तरावर सर्वोत्तम प्रयत्न करण्यासाठी येथे जमलो आहोत.
पण असे काही लोक आहेत ज्यांना आपले यश बघणे सहन होत नाही. ते जगातील वाईट प्रवृत्ती, कलह आणि विसंवादाचे ठेकेदार आहेत.
आजच, आपले दक्ष पोलिस दल अशा विघातक दलांकडून आपल्या सभेवर होणारा हल्ला परतवून लावण्यात यशस्वी ठरले.
या देशद्रोही लोकांनी माझ्या देशाचा अभिमान आणि जागतिक स्तरावर असलेली ओळख नष्ट करण्याचा प्रयत्न केला.
ओह
आह
ओह
परंतु असे प्रयत्न नेहमी अपयशी ठरतात, कारण ते अशा प्रयत्नांमुळे उलट राष्ट्रहिताचे रक्षण करण्याचा आमचा संकल्पच अधिक मजबूत करतात.


माझ्या सरकारचा प्रत्येक स्तंभ जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे!
WHERE ARE THESE TERRORISTS? All those detained are students, Refugees & Farmers!
आपली न्यायपालिका, कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि प्रसारमाध्यमे यांचा अविकसित राष्ट्रांना हेवा वाट असतो.
WORLD LEADERS PRAISE INDIA!
आमच्या इथला मानवी हक्कांच्या नोंदीचा इतिहास अतुलनीय आहे.
ANTINATIONAL THREAT AT G20
धर्मनिरपेक्षतेशी आमची बांधिलकी हाच आमच्या वाढीचा सर्वात महत्त्वाचा पैलू आहे.
आम्हाला जनतेचा पूर्ण पाठिंबा आहे. एकत्रितपणे, आम्ही प्रगतीच्या दिशेने मोठे पाऊल टाकत असतो!
जी20 शिखर परिषदेचा समारोप होताच, लोकांचे रक्त, घाम आणि अश्रू त्वरीत धुवून काढले जातात आणि जागा पुन्हा होती तशी, पूर्ववत होते.
G20


माझा विश्वासच बसत नाहीये!
काय प्रकरण आहे, फातिमा?
ATTEMPTED DISRUPTION AT G20
BHARAT TIMES
G20 SUMMIT A SUCCESS!
तो जी20 शिखर परिषद आपल्यासाठी पुन्हा एकदा अपयशी ठरली आहे!
त्यांनी काहीतरी महान साध्य केल्याचा ते आव आणत आहेत, परंतु प्रत्यक्षात कोणतीही कारवाई झालेली नाही.
हं - पण मला ते अपेक्षितच होते. दरवर्षी तर असेच होते, नाही का?
अम्मी हे वर्षानुवर्षे चालत राहणे आपल्याला परवडणार नाही.
आपले भविष्य जागतिक भांडवलदारांच्या आणि युद्धखोरांच्या हातात आहे जे त्यांच्या स्वार्थी विषयपत्रिकेच्या पलीकडे पाहू शकत नाहीत.
आपल्याच पंतप्रधानांनी निव्वळ-शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी 2070 ची अन्यायी मुदत दिली आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की कोणाला सर्वात जास्त फायदा होणार आहे आणि कोणाला भुर्दंड बसणार आहे.


सुमुदच्या कल्पनेबद्दल मी तुला काय सांगितले ते आठवते?
पूर्णपणे आठवत नाहीये.
पॅलेस्टिनी लोकांनी वर्षानुवर्षे झालेल्या अत्याचार, शोषण आणि हिंसाचारानंतर ही विचारसरणी निवडली.
इंग्रजीत समजावून सांगणे माझ्यासाठी कठीण आहे, परंतु जेव्हा अन्याय आणि हिंसा तुम्हाला सर्वात प्रिय असलेल्या गोष्टींचा नाश करते, तेव्हा तुम्ही खंबीर राहता आणि अत्याचाराचा प्रतिकार करता.
तुमच्या कृती - तुमच्या लोकांसाठीच्या, तुमच्या भूमीसाठीच्या प्रेमावर आधारित आहेत. सोप्या भाषेत सांगायचं तर, ती त्वरित सावरण्याची लवचिकता आहे.
आज तुझी स्वतःची लढाई नाही आहे का?
होय, आहे! केपेममधील बेकायदेशीर खाण प्रकरणाची अंतिम सुनावणी.
विश्वास ठेव आणि चांगला लढा दे. तू एकटी नाही आहेस.


माँ, मी या लढाईत कधीच एकटी नसते. यात विद्यार्थी आणि कार्यकर्ते आघाडीवर  आहेत आणि ते त्यांच्या भविष्यासाठी लढत आहेत. मी फक्त त्यांना कोर्टात पाठिंबा देते!
STOP ILLEGAL MINING!
आणि आम्ही युद्ध जिंकूच! एका वेळी एक लढाई, लढत राहू!


# 20च्या ~~टोळीची~~ गटाची उत्पत्ती nlo

सन 1999 मध्ये स्थापन झालेल्या, आशियाई आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर, जी20 समूहाची घोषणा जी7 समूहाच्या अर्थमंत्र्यांनी वित्त आणि आर्थिक प्रश्नांवर आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी एक मंच म्हणून केली होती आणि जगातील वीस मोठ्या प्रस्थापित आणि उदयोन्मुख अर्थव्यवस्थांमधील अर्थमंत्री आणि केंद्रीय बँकर्सना एकत्र आणण्याचे व्यासपीठ म्हणून हा समूह कार्य करणार होता. तथापि,  राज्याचे प्रमुख आणि सरकार या स्तरावरील जी20 बैठका 2008 च्या आर्थिक संकटाच्या ऋणी आहेत ज्या सर्वोच्च राजकीय स्तरावरील भांडवलशाही वाचवण्यासाठी संकट समन्वयाची यंत्रणा म्हणून अस्तित्वात आल्या. तेव्हापासून, जी20 नेते नियमितपणे भेटत आहेत आणि जी20 हे आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्याचे केंद्रीय व्यासपीठ बनले आहे. जी20 अर्थव्यवस्था एकूण देशांतर्गत उत्पादनानुसार (जीडीपी ) जागतिक आर्थिक उत्पादनाच्या सुमारे 80 टक्के उत्पादन करतात जे क्रय शक्ती समानतेसाठी समायोजित केले जाते आणि या अर्थव्यवस्थांचा एकत्रितपणे जागतिक व्यापारात तीन चतुर्थांश वाटा आहे. जगभरात सर्वाधिक निर्यात करणाऱ्या 20 देशांपैकी 15 देश जी20 चे सदस्य आहेत. जगातील दोन तृतीयांश लोकसंख्या जी20 सदस्य देशांमध्ये राहते.



# प्रथम पसंतीचा मंच : रचनेनुसार सोयिस्कर आणि अनन्य

जी20 चे सदस्यत्व किंवा त्याऐवजी जी7 (आणि नंतर जी8) वरून जी20पर्यंतचा विस्तार एका स्वयं-शैलीच्या कॉलेजियमकडे निर्देश करतो जो निवडप्रक्रियेतून प्रगट झाला - जागतिक आर्थिक व्यवस्थेच्या मोठ्या पुनर्रचनेशिवाय साम्राज्यवादी गाभा टिकवून ठेवण्याची निवड. सोप्या भाषेत सांगायचे तर, जी20ची रचना विकसनशील राष्ट्रांच्या लहान अल्पसंख्याकांच्या टोकन प्रतिनिधित्वाद्वारे वैधता प्राप्त करण्यासाठी योजनेकडे निर्देश करते. दुसऱ्या देशांना डावलून काही विशिष्ट देशांना घेण्याचा निर्णय केवळ अधिक प्रश्नांसाठी जागा करतो. रशिया आणि चीनचा समावेश अपरिहार्य होता आणि त्यासाठी आवाहन करण्यात आले. इराणऐवजी सौदी अरेबियाचा समावेश; इजिप्त आणि नायजेरियाऐवजी (जरी त्या आफ्रिकेतील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्था आहेत) दक्षिण आफ्रिका; आणि व्हेनेझुएलाऐवजी मेक्सिको, अर्जेंटिना, ब्राझील ही सदस्यत्वावरील निर्बंधांची काही उल्लेखनीय उदाहरणे आहेत. त्या काळात विलीन होणाऱ्या अर्थव्यवस्थेची सह-निवड हा बहुपक्षीय संस्थांवर जी7च्या नियंत्रणाचा तोही व्यापक वैधता आणि विकसनशील जगातील उदयोन्मुख देशांच्या समर्थनासह सर्वात सोपा मार्ग होता. ब्रेटन वूड्स संस्थांची पुनर्रचना न करता जागतिक भांडवलशाही व्यवस्थापित करण्याची जबाबदारी या गटाने स्वतःहून घेतली असल्याने हा गट आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यापासून खूप दूर आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.



# जी20चे कार्य कसे चालते?

जी20 ही संस्था मुख्यालये, कार्यालये, सचिवालय किंवा कर्मचारी असलेली कायमस्वरूपी संस्था नाही. विषयपत्रिका आणि क्रियाकलाप सर्व सदस्य देशांशी सल्लामसलत करून, फिरत्या अध्यक्षपदाच्या माध्यमातून ठरवले जातात. सातत्य सुनिश्चित करण्यासाठी, 'ट्रोइका' प्रणाली कार्यरत आहे. ट्रोइकामध्ये सध्याचा यजमान देश, त्याचा पूर्ववर्ती आणि त्याचा उत्तराधिकारी देश यांचा समावेश होतो. सन 2023चे जी20चे अध्यक्षपद भारताकडे असेल.

जी20 बैठका तीन प्रमुख प्रवाहात होतात. वित्त मार्ग जेथे मौद्रिक, वित्तीय आणि विनिमय दर धोरणे, पायाभूत सुविधा गुंतवणूक, वित्तीय नियमन, वित्तीय समावेशन आणि आंतरराष्ट्रीय कर आकारणी यासारख्या जागतिक आर्थिक आणि आर्थिक समस्यांवर प्राथमिक लक्ष केंद्रित केले जाते. या मध्ये, या राष्ट्रांतील सरकारे (अर्थमंत्र्यांच्या माध्यमातून) आणि केंद्रीय बँक गव्हर्नर वर्षभर मंत्री स्तरावर भेटतात. मंत्री-स्तरीय बैठकांचे निष्कर्ष वार्षिक जी20 शिखर परिषदेत एकत्र आणले जातात, जेथे नेते संभाषणातील निष्कर्षांवर आधारित त्यांचे निर्णय तयार करतात आणि त्यांची अंमलबजावणी करतात.

शेर्पा मार्ग महत्त्वाच्या व्यापक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो, ज्यात प्रमुख मुद्दे जसे की राजकीय सहभाग, लैंगिक समानता, व्यापार, शाश्वत विकास, कर्ज इ. आणि वारसा व प्राधान्यक्रम विषय जसे की महामारी, हवामान बदल, आपत्ती लवचिकता, स्थलांतर इ. समाविष्ट असतात. देश आपापले संबंधित दूत आणि मंत्रालयांच्या प्रतिनिधींसह या बैठकांना उपस्थित राहतात. जी20 सदस्य राष्ट्रांनी विविध नागरी समाज भागधारक किंवा सामाजिक कार्यकर्त्यांचा व्यापक सहभाग मिळविण्यासाठी प्रतिबद्धता गट (सध्या एकूण 8) तयार केले आहेत. त्यांनी सरकारचे प्रतिनिधित्व करू नये आणि त्यांनी स्वायत्त, स्वतंत्र गट म्हणून काम केले पाहिजे, असे अपेक्षित असते.

जी20ची भूमिका प्रामुख्याने भागधारकांचा समुदायावर आंतरराष्ट्रीय स्तरावर दबाव आणणे, संवाद सुलभ करणे आणि विशेषत: सध्याच्या परस्परावलंबी बाजार अर्थव्यवस्थांच्या देखभालीसाठी आणि सर्वसाधारणपणे जागतिक भांडवलशाहीच्या देखभालीसाठी संस्थात्मक संतुलन राखणे हे आहे. जागतिक प्रशासनाच्या विद्यमान संरचनेत, जी-2कडे एक प्रकारचा अनौपचारिक प्रकार निर्माता म्हणून पाहिले जाऊ शकते, जेथे बहुतेक धोरणात्मक शिफारसी क्लब प्रशासन स्वरूपामधून उद्भवतात. पुढे हे क्लब प्रशासन स्वरूप फार शक्तिशाली बनले आणि जागतिक वित्तीय रचनेतील वादविवादाचे एक प्रमुख केंद्र बनले.

# जी20मुळे ओढवू शकणाऱ्या आगामी समस्या

## प्रथमत:,

जी20 ही एकसंध, सुसंगत संस्था नाही आणि अंतर्गत आणि रचनात्मक विभाजनांनी त्रस्त आहे. हे वरवर पाहता जी7 पेक्षा अधिक लोकशाहीवादी आहे परंतु तरीही ती श्रेष्ठ-कनिष्ठ पद्धतीने कार्य करणारी एक स्वयं-नियुक्त उच्चभ्रू संघटना असल्याचे प्रतिबिंबित करतेच कारण जागतिक आर्थिक उत्पादनाच्या 80% वाटा त्यांचा आहे. जर आर्थिक न्यायाबद्दल आपण बोलत असू तर जगाच्या दक्षिणेतील काही प्रमुख देश अनुपस्थित असताना सामाविष्ट आर्थिक समन्वयासाठी काय प्रयत्न केले जात आहेत, असा प्रश्न यातून उद्भवतो.

## दुसरे

म्हणजे, या प्रकारातील अनेक गटांप्रमाणेच, G20ची उत्पत्ती वैश्विक आहे. किशोरवयात असलेल्या क्लबने आर्थिक धोरणाच्या चौकटीच्या पलीकडे जाणाऱ्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी स्वतःला वैविध्यपूर्ण बनवले आहे, त्याला एक आंतरसरकारी राजकीय मंच म्हणून नवीन रूप दिले आहे. तथापि, इतर कोणत्याही राजकीय मंचाप्रमाणेच, निर्णायक विषयांवर कोणतेही महत्त्वपूर्ण पाऊल न उचलता ते केवळ 'उच्चवर्गीय वल्गना केंद्र' ठरले आहे. हवामान बदल, फक्त ऊर्जा संक्रमण, न्याय्य व्यापार आणि विकसनशील देशांचे कर्ज हे सर्व मुद्दे लक्ष वेधून घेणारे आहेत परंतु सर्वात वाईट गोष्ट म्हणजे सर्वात उत्तम किंवा नवउदार धोरणाच्या उपाययोजनांमध्ये यावर कोणतेही ठोस उपाय योजले जात नाहीत.

## तिसरे

म्हणजे, जी20 हा आर्थिक प्रशासनाच्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेतील एक मोठा अडथळा आहे. बऱ्याच प्रकारे, हे सामर्थ्याची विषमता आणि राजकीय अर्थव्यवस्था यांच्या केंद्रस्थानी आहे, जे सध्या कामगारांच्या जागतिक विभाजनावर प्रभुत्व गाजवते. हा गट अशा संस्थांचादेखील प्रतीक आहे, जे श्रम विभागणी वाढवत राहतात आणि जगाच्या अस्थिमय नवउदारवादी विचारसरणीचे प्रतीक आहेत. जी20 ची निर्मिती हा खरे तर संयुक्त राष्ट्रांतर्गत समान पातळीवरील समन्वय प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नाला भरकटवण्याचा आणि कमी लेखण्याचा प्रयत्न होता, परंतु जी20 ने अशा प्रक्रियेसाठी एक उदाहरण प्रस्थापित केले आहे जे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक प्रशासनाच्या प्रक्रियेशी जुळवून घेतेच आणि त्यासाठी कधी कधी स्वतःलाही विरोध करते.

# भारत आणि 2023चे जी20 अध्यक्षपद: भारतीय नागरी समाजापुढील आव्हाने

या उच्च स्थानी विराजमान होत असताना भारताची नेमकी भूमिका काय असेल हे विचारणे महत्त्वाचे आहे - यामुळे काही महत्त्वाचे मुद्दे चर्चेसाठी परिषदेत आणले जातील की जी7 प्रक्रियेत घेतलेल्या निर्णयांना पुन्हा वैध बनविण्याचेच काम केले जाईल. विकसनशील देशांचे, तिसऱ्या विश्वाचे काही महत्त्वाचे मुद्दे मांडले जातात का की कोणतीही स्वतंत्र भूमिका न घेता हवेतील आश्वासने आणि नीरस विधाने करत विकसित देशांना खुश करण्यातच शिखर परिषद संपते का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. याहूनही महत्त्वाचे म्हणजे नागरी समाजाची भूमिका ही आहे की त्यांना या मुद्द्यांकडे पाहण्यासाठी आणि ती सोडवण्यासाठी भाग पाडणे. तसेच, या संदर्भात दक्षिणेकडील (ग्लोबल साउथ) नेतृत्व हे अपरिहार्यपणे पुरोगामी असेल असे मानणे चुकीचे ठरेल कारण ग्लोबल साउथमधील बऱ्याच सरकारांनी नवउदारवादाचा स्वीकार केला आहे, ती आंतरराष्ट्रीय आर्थिक राजधानीचा भाग आहेत आणि जागतिक प्रभुत्ववादी अभिजात वर्गाचा भाग म्हणून (भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका मधील असमानतेची आकडेवारी लक्षात घेता) त्यांना स्थान दिले जाऊ शकते. अधिकृत शिखर परिषदेतील विद्यमान गोंधळ, अर्धपंगुत्व आणि निष्क्रियता कदाचित टिकून राहतील कारण नेते फारच कमी कल्पनाशक्ती आणि वचनबद्धता दर्शवतात. स्पष्टपणे सांगायचं तर,त्यांच्या मनात फक्त तुटलेले तुकडे एकत्र करून कृतीसाठी कालमर्यादा पुढे पुढे ढकलत राहणे हेच साध्य करणे असेल. तथापि, ही परिस्थिती इष्टही किंवा टिकाऊही नाही कारण आपण अनेक आघाड्यांवर कल्पनाही करू शकणार नाही इतक्या संकटाच्या जवळ आहोत. यापैकी काही संस्थांचा विचार करता बौद्धिक स्पर्धेची पातळी वाढणे आवश्यक आहे कारण जेव्हा जागतिकीकरणाची शक्ती राष्ट्रीयतेवर आदळते, तेव्हा त्याबरोबर येणाऱ्या प्रस्थापित शक्तीचा प्रतिकार करणे कठीण होते. भारतीय नागरी समाजासाठी हे महत्त्वाचे आहे की 2023च्या शिखर परिषदेकडे जाणारे विचारविनिमय सर्वसमावेशक पद्धतीने सुरू होईल आणि राष्ट्रीय भौतिक संदर्भांवर आधारित असतील आणि आंतरराष्ट्रीय दृष्टीकोनातून नेतृत्व केले जाईल जेणेकरून आम्ही आमच्या स्वत:च्या उपसाम्राज्यीय स्थितीपासून दूर जाऊ शकू. तळागाळातील आणि चौकटीबाहेरील घटकांपासून बांधणी करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

चहा-पाणी तलावाच्या काठी एक प्रचंड आवार तयार झाले आहे. सर्वोत्कृष्ट दर्जाच्या सुविधांनी सजलेले, जी20 (20ची टोळी ) वार्षिक बैठकीसाठी प्रदर्शित होणारी भव्यता आणि दिव्यता पाहण्यासाठी जगातील नेते आणि आंतरराष्ट्रीय पत्रकार जमा झाले आहेत. 20 च्या टोळीने दाखवलेल्या कल्पनाशक्ती, वचनबद्धता आणि कृतीच्या अभावाबद्दल निषेध नोंदवण्यासाठी सर्वसामान्य प्राणी देशाच्या कानाकोप-यातून प्रवास करत येतील, या अपेक्षेने कार्यक्रमस्थळी तणावाचे वातावरण आहे. जनता नवीन वास्तवाला सामोरे जात आहे. "इन्कलाब झिंदाबाद" च्या घोषणांनी  स्थळाच्या बाहेरचा परिसर दुमदुमत आहे आणि सर्वोच्च नेत्याला देशविरोधी कारवायांच्या धोक्याची माहिती देण्यात आली आहे. धडक कारवाई सुरू झाली आहे. पण यावेळी परिस्थिती वेगळी आहे - शेतकरी, कामगार वर्ग, विद्यार्थी, निर्वासित आणि उपेक्षित लोक एकत्र आले आहेत! आणि सज्ज झाले आहेत एका वेळी एक लढाई करण्यासाठी !

नफा, शक्ती आणि वैयक्तिक फायदा त्यांच्या बँकेच्या तपशिलांचे तेजस्वी, डिजिटल दिवे, कमी होणारा पैसा, मोजक्या लोकांसाठी अनेकांकडून हस्तगत केलेली मौल्यवान सामाजिक संपत्ती याशिवाय दुसरे काहीही पाहू शकत नाही. हे समयोचित कॉमिक जागतिक नेतृत्वाच्या निस्तेजपणाची झलक देते. हे आम्हाला सांगते की आम्हाला काहीतरी चांगले हवे आहे. ऑक्सिजन, कदाचित, वातानुकूलित शून्यतेच्या शिळ्या हवेपेक्षा अजून काहीतरी चांगले!

**- विजय प्रसाद**

हे कॉमिक सामर्थ्याचा दिखावा आणि प्रतिकाराची अपरिहार्यता यावर प्रभावीपणे भाष्य करते. उत्कृष्ट उपहासाचे हे एक उदाहरणच आहे.

**- नीरा चांडोके**

CFA
Centre for Financial Accountability

